**महाराष्ट्र शासन**
नगर विकास विभाग, मंत्रालय, ४ था मजला, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
nirmal.chaudhari@gov.in

---

क्रमांक : टिपीबी-४३२०/२१५/प्र.क्र.१०८/२०२०/नवि-११ दिनांक :-२९ /०२/२०२४

प्रति,
**आयुक्त,**
बृहन्मुंबई महानगरपालिका.

विषय :-To charge Premium for first staircase and not to charge premium for second staircase as per Reg. 48(5)(A) in High rise building.

संदर्भ :- प्रमुख अभियंता ( वि.नि.) बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र. ChE क्र. ChE/D.P./५६७३/Gen., दि. १०/९/२०२० व पत्र दि.१/०२/२०२४.

महोदय,

संदर्भित पत्राचे कृपया अवलोकन व्हावे.

मे. क्रेडाई एमसीएचआय यांचे विनंतीचे अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने संदर्भित पत्राद्वारे अर्जदार यांचे पत्रातील अधिकच्या जीन्यासाठी अधिमूल्य आकारणी तसेच लिफ्ट वेल चे क्षेत्र चटई क्षेत्र निर्देशांकाकरीता एकदाच हिशोबित करणे या मुद्दयांबाबत महापालिकेने मार्गदर्शक / स्पष्टीकरण अपक्षिले आहे. त्याअनुषंगाने आपणास खालीलप्रमाणे कळविण्याचे मला आदेश आहेत:-

i) विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ चे विनियम ४८(५)(A)(b) मधील तरतूदीनुसार उंच इमारती ( High Rise ) साठी दोन किंवा अधिक जिने आवश्यक असल्यास सदर जिने हे अधिमूल्याची आकारणी करुन चटई क्षेत्र निर्देशांकाचे गणनेतून वगळण्यात यावेत. त्या व्यतिरिक्त अतिरिक्त जिना (Fire escape Staircase ) प्रस्तावित करावयाची असेल तर अशा जिन्याकरीता विनियम ४८(५)(A) मधील उपखंड (c) च्या तरतूदी लागू होतील व त्यानुसार अ शा वाढीव / अतिरिक्त जिन्याचे क्षेत्र हे अधिमूल्याची आकारणी न करता चटई क्षेत्र निर्देशांकाचे गणनेतून वगळण्यात यावेत.

ii) नॅशनल बिल्डींग कोड मधील "*the area of the lift shaft can be taken only on one floor for the purpose of computation of FSI.*" ही तरतूद विचारात घेऊन त्यानुसार

महापालिकेने चटई क्षेत्र निर्देशांकाची गणना करताना इमारतीतील लिफ्ट वेल चे क्षेत्र एकाच मजल्यावर चटई क्षेत्र निर्देशांकाचे गणनेकरीता विचारात घेण्यात यावे."

**आपला,**

**(अमर पाटील )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत** :- १) प्रमुख अभियंता (वि.नि.), बृहन्मुंबई महानगरपालिका.

२) मे. क्रेडाई-एमसीएचआय, मेकर्स भवन-II, ठकरसी मार्ग, न्यू मरीन लाईन, मुंबई.

३) निवडनस्ती (नवि-११)